राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार जिल्हा परिषद पालघर अंतर्गत एकूण ५७ शाळांचे सक्षमीकरण व दर्जावाढ करून एकूण १७१ प्राथमिक पदांचे श्रेणीवर्धन करण्याबाबत

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांकः MSC-२१०२२/७/२०२६-MSC-SM-५

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
तारीख: २६ ऑक्टोबर, २०२६

<u>वाचा</u>

1) **शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक: नमाशा-१४१७/ प्र.क्र.४६०/एसएम-२, दिनांक ३१ जुलै, २०१७**
2) **शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांकः प्राशाव -२०२३/ प्र. क्र. ९७/ एसएम-५, दि.१५ मार्च, २०२४**
3) **मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद पालघर यांचे क्रमांकः पाजिप/शिक्षण/ प्राथ/बशी-२१७/२०२५/१६८२ दि. १९ ऑक्टोबर, २०२५ चे पत्र**

<u>प्रस्तावना</u>

पालघर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता जिल्हा परिषदेच्या ६० प्राथमिक शाळांना इयत्ता ९ वी व १० वी चे वर्ग जोडण्याकरीता संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णय दि. ३१.०७.२०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सदर शासन निर्णयामध्ये नमूद तरतूदींनुसार उक्त शाळांकरीता आवश्यक असलेली नियमित पदे वित्त विभागाच्या मान्यतेने यथावकाश निर्माण करण्याच्या अनुषंगाने स्पष्ट नमूद करण्यात आले होते. तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णय दि. १५.०३.२०२४ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांचे सक्षमीकरण व दर्जावाढ करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयान्वये जिल्हानिहाय मंजूर पायाभूत पदांच्या मर्यादेत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी च्या शाळांना इयत्ता ५ वी चा वर्ग व आवश्यकता असल्यास उच्च प्राथमिक व माध्यमिक वर्ग जोडण्यास तसेच इयत्ता १ ली ते इयत्ता ७ वी च्या शाळांना इयत्ता ८ वी चा वर्ग व आवश्यक असल्यास माध्यमिकचे वर्ग जोडण्यास मान्यता प्रदान करण्यास सक्षम प्राधिकारी म्हणून अनुक्रमे संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद/आयुक्त, महानगरपालिका यांना घोषित करण्यात आले आहे. तसेच सदर वर्ग जोडताना कार्यरत शिक्षकांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार सदर शिक्षक वर्ग करत असताना प्राथमिक / माध्यमिक प्रवर्गातील शिक्षकांच्या वेतनास संरक्षण देऊन मंजूर पायाभूत रिक्त पदांच्या मर्यादेत सदर वर्ग जोडण्यास मान्यता देण्यात यावी. सदर वर्ग जोडताना प्राथमिक मधून माध्यमिक व माध्यमिक मधून प्राथमिक मध्ये पायाभूत पदे वर्ग करण्याची आवश्यकता

असल्यास अशा पदांना वेतन अदा करण्यामधील वित्तीय बाबींकरीता सविस्तर प्रस्ताव विहित पद्धतीने शासनास सादर करावा अश्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून संदर्भ क्र. २ अन्वये प्राप्त झालेल्या जिल्हा परिषद पालघर संचालित एकूण ५७ प्राथमिक शाळांना माध्यमिक चे वर्ग जोडण्याच्या अनुषंगाने एकूण १७१ पदांच्या श्रेणीवर्धानाचा प्रस्ताव प्राप्त झाला होता. शासन निर्णय दि. १५.०३.२०२४ सोबतच्या परिशिष्ट अ नुसार जिल्हा परिषद पालघर येथील एकूण मंजूर पायाभूत पदे ७२९२ पैकी सन २०२५-२६ च्या संचमान्यतेनुसार ६३४८ पदे मंजूर करण्यात आली आहे. सबब उर्वरित ९४४ प्राथमिक पदांपैकी १७१ पदांचे माध्यमिक पदांमध्ये रूपांतरण आवश्यक आहे. सदर प्रस्तावास वित्त विभागाच्या उप समिती व तसेच उच्च स्तरीय समितीची चक्रीय पद्धतीने मान्यता घेण्यात आली असून जि. प. पालघर संचालित एकूण ५७ शाळांच्या दर्जावाढीस व त्यानुषंगाने प्राथमिक मधील १७१ पदांचे माध्यमिक मधील पदांमध्ये श्रेणीवर्धन करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

जिल्हा परिषद, पालघर संचलित खालील तक्त्यात मध्ये नमूद शाळांच्या दर्जावाढीस व त्यानुषंगाने मंजूर पायाभूत पदाच्या मर्यादेतील प्राथमिक मधील १७१ पदांचे माध्यमिक पदांमध्ये श्रेणीवर्धन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र.	शाळेचे नाव	तालुका	सद्यस्थिती कार्यरत वर्ग	जोडण्यात आलेले वर्ग इ.९ वी १० वी		माध्यमिक मध्ये श्रेणीवर्धित करण्यात आलेली पदे
				इ.९ वी	इ.१० वी	
१	जि.प. शाळा करंजगाव पाटीलपाडा	तलासरी	इ.१ली ते ८ वी	१	१	३
२	जि.प. शाळा अन्वीर पाटीलपाडा	तलासरी	इ.१ली ते ८ वी	१	१	३
३	जि.प. शाळा कवाडा ठाकरपाडा	तलासरी	इ.१ली ते ८ वी	१	१	३
४	जि.प.शाळा उधवा मराठी	तलासरी	इ.१ली ते ८ वी	१	१	३
५	जि.प.शाळा शेतकी शाळा तलासरी	तलासरी	इ.१ली ते ८ वी	१	१	३
६	जि.प.शाळा डोंगरी विल्हात पाडा	तलासरी	इ.१ली ते ८ वी	१	१	३
७	जि.प.शाळा कोचाई वडी पाडा	तलासरी	इ.१ली ते ८ वी	१	१	३
८	जि.प.शाळा वसा पाटीलपाडा	तलासरी	इ.१ली ते ८ वी	१	१	३
९	जि.प.शाळा आमगाव पाटीलपाडा	तलासरी	इ.१ली ते ८ वी	१	१	३

अ. क्र.	शाळेचे नाव	तालुका				
			सद्यस्थिती कार्यरत वर्ग	जोडण्यात आलेले वर्ग इ.९ वी १० वी		माध्यमिक मध्ये श्रेणीवर्धित करण्यात आलेली पदे
				इ.९ वी	इ.१० वी	
१०	जि.प.शाळा गिरगाव आरजपाडा	तलासरी	इ.१ली ते ८ वी	१	१	३
११	जि.प.शाळा सावरोली डोंगरीपाडा	तलासरी	इ.१ली ते ८ वी	१	१	३
१२	जि.प.शाळा वेवजी नाना पाडा	तलासरी	इ.१ली ते ८ वी	१	१	३
१३	जि.प.शाळा हातेरी	जव्हार	इ.१ली ते ८ वी	१	१	३
१४	जि.प.शाळा बेहेडपाडा	जव्हार	इ.१ली ते ८ वी	१	१	३
१५	जि.प.शाळा तलासरी	जव्हार	इ.१ली ते ८ वी	१	१	३
१६	जि.प.शाळा कालीधोंड	जव्हार	इ.१ली ते ८ वी	१	१	३
१७	जि.प.शाळा सारसुन	जव्हार	इ.१ली ते ८ वी	१	१	३
१८	जि.प.शाळा पिंपळशेत	जव्हार	इ.१ली ते ८ वी	१	१	३
१९	जि.प.शाळा हाडे	जव्हार	इ.१ली ते ८ वी	१	१	३
२०	जि.प.शाळा चौक	जव्हार	इ.१ली ते ८ वी	१	१	३
२१	जि.प.शाळा कुंडाचापाडा	जव्हार	इ.१ली ते ८ वी	१	१	३
२२	जि.प.शाळा पवारपाडा	जव्हार	इ.१ली ते ८ वी	१	१	३
२३	जि.प.शाळा साखरशेत	जव्हार	इ.१ली ते ८ वी	१	१	३
२४	जि.प.शाळा वंकास	डहाणु	इ.१ली ते ८ वी	१	१	३
२५	जि.प.शाळा सरावली पाटीलपाडा	डहाणु	इ.१ली ते ८ वी	१	१	३
२६	जि.प.शाळा मुहुंडळपाडा	डहाणु	इ.१ली ते ८ वी	१	१	३
२७	जि.प.शाळा शिसने	डहाणु	इ.१ली ते ८ वी	१	१	३
२८	जि.प.शाळा सायवन	डहाणु	इ.१ली ते ८ वी	१	१	३
२९	जि.प.शाळा आंबेसरी	डहाणु	इ.१ली ते ८ वी	१	१	३
३०	जि.प.शाळा धानिवरी	डहाणु	इ.१ली ते ८ वी	१	१	३
३१	जि.प.शाळा जांबूपाडा	डहाणू	इ.१ली ते ८ वी	१	१	३
३२	जि.प.शाळा गंजाड	डहाणू	इ.१ली ते ८ वी	१	१	३
३३	जि.प. शाळा कैनाड नाईकपाडा	डहाणू	इ.१ली ते ८ वी	१	१	३
३४	जि.प. शाळा शिलोंडा	डहाणू	इ.१ली ते ८ वी	१	१	३
३५	जि.प. शाळा मोडगाव पाटीलपाडा	डहाणू	इ.१ली ते ८ वी	१	१	३
३६	जि.प. शाळा कोटबी भूजडपाडा	डहाणू	इ.१ली ते ८ वी	१	१	३
३७	जि.प. शाळा चंद्रनगर	डहाणू	इ.१ली ते ८ वी	१	१	३

अ. क्र.	शाळेचे नाव	तालुका	सद्यस्थिती कार्यरत वर्ग	जोडण्यात आलेले वर्ग इ.९ वी १० वी		माध्यमिक मध्ये श्रेणीवर्धित करण्यात आलेली पदे
				इ.९ वी	इ.१० वी	
३८	जि.प.शाळा खुनावडे शंकर पाडा	डहाणू	इ.१ली ते ८ वी	१	१	३
३९	जि.प.शाळा डाहे	वाडा	इ.१ली ते ८ वी	१	१	३
४०	जि.प.शाळा वरसाळे	वाडा	इ.१ली ते ८ वी	१	१	३
४१	जि.प.शाळा वेहेलपाडा	विक्रमगड	इ.१ली ते ८ वी	१	१	३
४२	जि.प. शाळा केगवे	विक्रमगड	इ.१ली ते ८ वी	१	१	३
४३	जि.प.शाळा दादडे	विक्रमगड	इ.१ली ते ८ वी	१	१	३
४४	जि.प.शाळा मुसलपाडा	विक्रमगड	इ.१ली ते ८ वी	१	१	३
४५	जि.प.शाळा सारशी	विक्रमगड	इ.१ली ते ८ वी	१	१	३
४६	जि.प.केंद्र शाळा मोखाडा	मोखाडा	इ.१ली ते ८ वी	१	१	३
४७	जि.प. शाळा भारोल	वसई	इ.१ली ते ८ वी	१	१	३
४८	जि.प. शाळा पेल्हार	वसई	इ.१ली ते ८ वी	१	१	३
४९	जि.प. शाळा कुवारी उर्दु	वसई	इ.१ली ते ८ वी	१	१	३
५०	जि.प.शाळा नेहरू हिंदी विद्यालय	वसई	इ.१ली ते ८ वी	१	१	३
५१	जि.प. शाळा कामण मराठी	वसई	इ.१ली ते ८ वी	१	१	३
५२	जि.प.शाळा मेढे	वसई	इ.१ली ते ८ वी	१	१	३
५३	जि.प.शाळा तुळींज उर्दू	वसई	इ.१ली ते ८ वी	१	१	३
५४	जि.प.शाळा सावरे	पालघर	इ.१ली ते ८ वी	१	१	३
५५	जि.प.शाळा रावते	पालघर	इ.१ली ते ८ वी	१	१	३
५६	जि.प.शाळा कोसबाड	पालघर	इ.१ली ते ८ वी	१	१	३
५७	जि.प.शाळा शिगाव	पालघर	इ.१ली ते ८ वी	१	१	३
एकूण		-	-	-	-	१७१

२. सदर १७१ पदे पवित्र पोर्टल मार्फ़त भरण्यात येतील. तसेच सदर श्रेणीवर्धनानंतर जिल्हा परिषद पालघर येथील २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाच्या संचमान्यतेमधील मंजूर असलेली ७२९२ पदे वजा जाता पायाभूत पदांची संख्या ही ६३४८ पदे असून त्यापैकी ९४४ मधील १७१ पदांना माध्यमिक मध्येश्रेणीवर्धनाकरीता मान्यता दिल्याने ७७३ प्राथमिक मंजूर पायाभूत पदे शिल्लक राहतात.

३. सदर शासन निर्णय हा वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.अनौप २४३/आपुक, दि.१०.१०.२०२६ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१०२६१७०४०८२१४९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by MOHINUDDIN B TASHILDAR
Date: 2026.10.26 18:32:53 +05'30'

(मो. बा. ताशिलदार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय ,मुंबई
४. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद , पालघर
६. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) , महाराष्ट्र राज्य , पुणे
७. शिक्षण संचालक (प्राथमिक) , महाराष्ट्र राज्य , पुणे
८. विभागीय शिक्षण उपसंचालक ,मुंबई विभाग, मुंबई
९. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक), पालघर
१०.निवडनस्ती (एसएम-५) (ई-१६०१५०९)